

देगलूर : महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्रसेना विभागात नवीन कॅडेट्सची भरती करण्यात आली.

# राष्ट्रीय छात्र सेनेच्या नवीन कॅडेट्सची भरती

देगलूर, ता.७ (बातमीदार) : महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्रसेना विभागात नवीन कॅडेट्सची भरती करण्यात आली. सदरील भरतीसाठी ५२ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. नांदेडचे कमांडिंग ऑफिसर मा. कर्नल रंगराव यांची उपस्थिती होती. कमांडिंग ऑफिसर कर्नल रंगराव व प्राचार्य डॉ. मोहन खताळ आणि अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंम्बरेकर, संस्थेचे सदस्य रवींद्र अप्पा द्याडे हे या वेळी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उप प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार व एनसीसीचे प्रमुख लेफ्ट. डॉ. निरजकुमार उपलंचवार यांच्या हस्ते कमांडिंग ऑफिसर कर्नल रंगराव यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. तसेच निवड प्रक्रिया यशस्वीरित्या संपन्न होण्याकरीत बटालियनचे सैनिक लाल मोहम्मद व जगता सिंग आणि महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. संतोष येरावार, प्रा.हाके सिताराम, मधुकर कांबळे व महाविद्यालयाचे कार्यालयीन आशिक्षक गोविंद जोशी, प्रशांत चौहाण, हेमनर गोविंद, मारोती सोनकांबळे, धनाजी वाघमारे व अजय गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

Scanned with OKEN Scanner